IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429

Volume 6, Issue 7, June 2026

Impact Factor: 8.2

# श्राव्य साहित्य : मौखिक परंपरेचा आधुनिक आविष्कार

**भारती श्रीधर कोळेकर**

संशोधक विद्यार्थी,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र, भारत)

bharatikolekar2012@gmail.com

**प्रस्तावना :** *साहित्य हा समाजाच्या सांस्कृतिक, बौद्धिक आणि भावनिक जीवनाचा आरसा आहे. प्रारंभीच्या काळात लेखनकला अस्तित्वात नव्हती त्यामुळे ज्ञान, परंपरा आणि साहित्यिक अभिव्यक्ती यांचे जतन, संवर्धन व प्रसार प्रामुख्याने मौखिक परंपरेद्वारे होत होते. कथा, आख्यायिका, धार्मिक प्रवचने, लोकगीते आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील ज्ञान, मूल्ये आणि अनुभव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत होते. मानवाच्या कथा सांगण्याच्या व ऐकण्याच्या परंपरेतूनच पुढे साहित्य निर्मितीस प्रेरणा मिळाली. परंतु काळानुसार साहित्याच्या अभिव्यक्तीची माध्यमे आणि पद्धती बदलत असलेल्या दिसून येतात.*

*भारतीय संस्कृतीत मौखिक परंपरेला अत्यंत प्राचीन आणि समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. वेदाध्ययन, वेदपठण, पुराणकथा भजन, कीर्तन, प्रवचन, भारुड, ओव्या, अभंग, इ. संतसाहित्य तसेच पोवाडे, लोककथा यांसारख्या मौखिक परंपरांनी साहित्य आणि समाज यांच्यातील नाते अधिकच दृढ झाले आहे. मराठी साहित्याचा इतिहास पाहता संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम आदी संतांच्या अभंगांचा प्रसार प्रामुख्याने मौखिक व श्राव्य माध्यमातूनच झाला असल्याचे दिसून येते. त्यामुळे मराठी साहित्य परंपरेत श्राव्य अनुभवाला अनन्यसाधारण स्थान प्राप्त झाले आहे.*

*आधुनिक काळात डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास, इंटरनेट, स्मार्टफोन आणि डिजिटल माध्यमांचा वाढता वापर यांमुळे संवादाच्या साधनांमध्ये आमुलाग्र बदल झाले आहेत. परिणामी साहित्याचे स्वरूपही बदलले आहे. आज पॉडकास्ट, ऑडिओबुक्स, ई-बुक्स (Text to Speech सुविधा असलेली), डिजिटल कथाकथन आणि विविध ऑडिओ प्लॅटफॉर्म यांच्या माध्यमातून साहित्याचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यातूनच श्राव्य साहित्याचा एक नवीन प्रवाह निर्माण झाल्याचे दिसून येते. सध्या साहित्याचा अनुभव हा श्राव्य स्वरूपातूनही अधिक प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे आज तंत्रज्ञानाच्या युगातील पिढी डिजिटल माध्यमातून श्राव्य साहित्याचा आस्वाद घेत असल्याचे लक्षात घेता येते. या पार्श्वभूमीवर आधुनिक साहित्य अभ्यासातील एक महत्त्वाचा विषय म्हणून श्राव्य साहित्याचा अभ्यास करणे प्रस्तुत ठिकाणी यथार्थ वाटते.*

*प्रस्तुत संशोधन लेखामध्ये श्राव्य साहित्य संकल्पना, डिजिटल क्रांतीतील श्राव्य साहित्याचे स्थान, मौखिक परंपरेचा आधुनिक आविष्कार म्हणून पॉडकास्ट, ऑडिओबुक्स आणि ई-बुक्स यांचे स्वरूप, श्राव्य साहित्याचे योगदान आणि श्राव्य साहित्यापुढील आव्हाने याविषयी विचार करण्याचा मानस आहे.*

**Keywords:** श्राव्य साहित्य : मौखिक परंपरेचा आधुनिक आविष्कार

## I. प्रस्तावना :

साहित्य हा समाजाच्या सांस्कृतिक, बौद्धिक आणि भावनिक जीवनाचा आरसा आहे. प्रारंभीच्या काळात लेखनकला अस्तित्वात नव्हती त्यामुळे ज्ञान, परंपरा आणि साहित्यिक अभिव्यक्ती यांचे जतन, संवर्धन व प्रसार प्रामुख्याने मौखिक परंपरेद्वारे होत होते. कथा, आख्यायिका, धार्मिक प्रवचने, लोकगीते आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील ज्ञान, मूल्ये आणि अनुभव पुढील

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

पिढ्यांपर्यंत पोहोचत होते. मानवाच्या कथा सांगण्याच्या व ऐकण्याच्या परंपरेतूनच पुढे साहित्य निर्मितीस प्रेरणा मिळाली. परंतु काळानुसार साहित्याच्या अभिव्यक्तीची माध्यमे आणि पद्धती बदलत असलेल्या दिसून येतात.

भारतीय संस्कृतीत मौखिक परंपरेला अत्यंत प्राचीन आणि समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. वेदाध्ययन, वेदपठण, पुराणकथा भजन, कीर्तन, प्रवचन, भारुड, ओव्या, अभंग, इ. संतसाहित्य तसेच पोवाडे, लोककथा यांसारख्या मौखिक परंपरांनी साहित्य आणि समाज यांच्यातील नाते अधिकच दृढ झाले आहे. मराठी साहित्याचा इतिहास पाहता संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम आदी संतांच्या अभंगांचा प्रसार प्रामुख्याने मौखिक व श्राव्य माध्यमातूनच झाला असल्याचे दिसून येते. त्यामुळे मराठी साहित्य परंपरेत श्राव्य अनुभवाला अनन्यसाधारण स्थान प्राप्त झाले आहे.

आधुनिक काळात डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास, इंटरनेट, स्मार्टफोन आणि डिजिटल माध्यमांचा वाढता वापर यांमुळे संवादाच्या साधनांमध्ये आमुलाग्र बदल झाले आहेत. परिणामी साहित्याचे स्वरूपही बदलले आहे.आज पॉडकास्ट, ऑडिओबुक्स, ई-बुक्स (text to speech सुविधा असलेली), डिजिटल कथाकथन आणि विविध ऑडिओ प्लॅटफॉर्म यांच्या माध्यमातून साहित्याचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यातूनच श्राव्य साहित्याचा एक नवीन प्रवाह निर्माण झाल्याचे दिसून येते.सध्या साहित्याचा अनुभव हा श्राव्य स्वरूपातूनही अधिक प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे आज तंत्रज्ञानाच्या युगातील पिढी डिजिटल माध्यमातून श्राव्य साहित्याचा आस्वाद घेत असल्याचे लक्षात घेता येते. या पार्श्वभूमीवर आधुनिक साहित्य अभ्यासातील एक महत्त्वाचा विषय म्हणून श्राव्य साहित्याचा अभ्यास करणे प्रस्तूत ठिकाणी यथार्थ वाटते.

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये श्रावय साहित्य संकल्पना, डिजिटल क्रांतीतील श्राव्य साहित्याचे स्थान, मौखिक परंपरेचा आधुनिक आविष्कार म्हणून पॉडकास्ट, ऑडिओबुक्स आणि ई-बुक्स यांचे स्वरूप, श्राव्य साहित्याचे योगदान आणि श्राव्य साहित्यापुढील आव्हाने याविषयी विचार करण्याचा मानस आहे.

## II. संशोधनाची उद्दिष्टे

१. मराठी साहित्य परंपरेतील मौखिक परंपरेचा अभ्यास करणे.
२. श्राव्य साहित्याची संकल्पना आणि स्वरूप अभ्यासणे.
३. पॉडकास्ट,ऑडिओबुक्स यांसारख्या आधुनिक माध्यमांचा अभ्यास करणे.
४. श्राव्य साहित्याचे योगदान अभ्यासणे.
५. डिजिटल युगात श्राव्य साहित्यापुढील आव्हानांचे विश्लेषण करणे.

## III. मौखिक परंपरा

मौखिक परंपरा ही मानवी संस्कृतीच्या इतिहासातील अत्यंत प्राचीन आणि प्रभावी संवादपद्धती आहे. लेखनकलेचा शोध लागण्यापूर्वी म्हणजेच मानवी संस्कृतीच्या सुरुवातीच्या टप्प्यात ज्ञान, संस्कृती, धर्म आणि सामाजिक मूल्यांचे जतन हे मुख्यतः मौखिक परंपरेच्या माध्यमातून होत होते. प्राचीन भारतीय संस्कृतीत गुरुकुल परंपरेत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया गुरु-शिष्यांच्या संवादातून म्हणजेच मौखिक पद्धतीनेच होत होती. हजारो वर्षे टिकून राहिलेल्या या मौखिक परंपरेमुळे वेद, उपनिषदे, पुराणकथा, धर्मग्रंथ, सामाजिक मूल्ये तसेच संस्कृतीचे जतन संवर्धन आणि केवळ स्मरणशक्तीच्या आधारावर केले जात होते. त्यातूनच हा वारसा पुढील पिढीकडे संक्रमित झाला आहे.

मराठी साहित्य व संस्कृतीत मौखिक परंपरेला महत्त्वाचे स्थान आहे. लोकसाहित्य, लोकगीते, ओव्या, पोवाडे यातून तसेच प्रवचन, कीर्तन, भारूड यांसारख्या भाषिक आविष्कारातून साहित्याबरोबरच सामाजिक इतिहास, सांस्कृतिक मूल्ये व जीवनमूल्ये लोकांपर्यंत पोहोचली जाऊन त्यांचे जतन केले असल्याचे दिसून येते. विशेषतः संत साहित्याचा प्रसार हा मोठ्या प्रमाणावर झाला तोही श्राव्य माध्यमातूनच. यामुळे साहित्य केवळ ग्रंथांपुरते मर्यादित न राहता लोकजीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. या सर्व परंपरांमधून असे स्पष्ट होते की श्राव्य माध्यम हे साहित्याच्या प्रसारासाठी अत्यंत प्रभावी साधन राहिले आहे. मौखिक परंपरेमुळे साहित्य लोकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडले गेले आहे. लोकांना न वाचताही साहित्याचा अनुभव घेता येऊ लागला. यामुळे साहित्याचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. या पारंपरिक मौखिक संस्कृतीचा आधुनिक आविष्कार म्हणजे आजचे श्राव्य साहित्य होय. पॉडकास्ट, ऑडिओबुक्स, ई-बुक्स आणि डिजिटल माध्यमे ही या मौखिक परंपरेची आधुनिक आवृत्ती अथवा प्रकार म्हणता येईल.

श्राव्य साहित्याची संकल्पना


DOI: 10.48175/IJARSCT-37518

साहित्य हे काळाचे अपत्य आहे असे मानले जाते. पारंपरिक अर्थाने आपण कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र इत्यादी लिखित स्वरूपातील वाङ्मय प्रकारांना साहित्य ही संज्ञा वापरतो. परंतु आधुनिक काळात साहित्य अनुभूतीच्या पद्धतीही बदलत आहेत. आज अनेक साहित्यप्रकार लिखित व श्राव्य अशा दोन्ही स्वरूपातही उपलब्ध होत आहेत. तसेच काही नव्या संकल्पनाही उदयास येत आहेत. त्यातीलच एक संकल्पना म्हणजे श्राव्य साहित्य होय.

"श्राव्य माध्यम म्हणजे केवळ ऐकून माहिती, ज्ञान आणि मनोरंजन पुरविणारी साधने होत. यामध्ये ध्वनीच्या माध्यमातून थेट श्रोत्यांशी साधला जाणारा संवाद प्रभावी असतो."१

"श्राव्य साहित्य (audio content) म्हणजे असे साहित्य जे केवळ ऐकून आस्वाद घेतला जाऊ शकतो. यामध्ये ध्वनी, आवाज, संगीत किंवा कथन (narration) द्वारे माहिती व भावना व्यक्त केल्या जातात. हे साहित्य वाचण्याऐवजी श्रवणेंद्रियांच्या मदतीने ग्रहण केले जाते. जसे की ऑडिओबुक्स, रेडिओ नाटके, पॉडकास्ट, भाषणे किंवा गाणी."२ यावरून ध्वनी, आवाज व संगीत इ.च्या माध्यमातून ऐकून ज्या साहित्याची अनुभूती घेतली जाते त्या साहित्याला श्राव्य साहित्य असे म्हणता येईल.

श्राव्य साहित्यामध्ये शब्दांची अनुभूती ध्वनीरूपातून मिळत असते. संवादात्मकता, भावनात्मकता आणि त्याची भावनिक अभिव्यक्ती ही श्राव्य साहित्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. आवाजातील चढउतार, भावना आणि लय यांच्या माध्यमातून श्रोत्याला साहित्यिक अभिव्यक्ती अधिक भावनिक, प्रभावी तसेच जिवंत स्वरूपात अनुभवावयास मिळते. त्यामुळे श्रोता लेखकाच्या भावनांना प्रत्यक्ष अनुभवू शकतो.

या प्रकारच्या साहित्यात पॉडकास्ट, ऑडिओबुक्स, रेडिओवरील नाटके, कविता वाचन, कथाकथन कार्यक्रम, साहित्यिक चर्चा अथवा चर्चासत्रे आणि व्याख्याने यांचा समावेश होतो. आधुनिक काळात या स्वरूपाला डिजिटल माध्यमांची जोड मिळाल्यामुळे श्राव्य साहित्य अधिक व्यापक झाले आहे.

श्राव्य माध्यमांमुळे दृष्टिहीन, दृष्टीदोष अथवा वाचन समस्या असलेल्या व्यक्तींना सहजपणे साहित्याचा आस्वाद घेता येतो. त्यामुळे श्राव्य साहित्य अधिक लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक बनले आहे. तंत्रज्ञानाच्या युगात श्राव्य साहित्याची लोकप्रियता वाढत असून साहित्य अभ्यासाचे एक स्वतंत्र क्षेत्र म्हणून श्राव्य साहित्य विकसित होत असल्याचे दिसून येत आहे.

## IV. डिजिटल युग आणि श्राव्य साहित्य

डिजिटल क्रांतीमुळे मानवी जीवनात आमुलाग्र बदल घडून आले आहेत. संवाद, ज्ञान आणि माहिती प्रसाराच्या पद्धतींमध्येही मोठे बदल झाले आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा वाढता वापर यामुळे कोणतीही माहिती अगदी सहजगत्या उपलब्ध होते. साहजिकच माहितीच्या स्वरूपात अधिक गतिमानता व सुलभता आली. या बदलला साहित्य क्षेत्रही अपवाद राहिले नाही.

पूर्वीच्या साहित्य प्रसाराच्या मुद्रित माध्यमातील पुस्तकांची जागा डिजिटल युगात पॉडकास्ट, ऑडिओबुक्स आणि ई-बुक्स यांसारख्या नवीन माध्यमांनी घेतली. या माध्यमांमुळे साहित्य प्रसाराला अधिक गतिमानता व व्यापकता प्राप्त होऊन या स्वरूपातील साहित्याला लोकप्रियताही मिळत आहे.

डिजिटल क्रांतीमुळे आज अनेक साहित्यिक आपल्या साहित्याचे वाचन, चर्चा अथवा संवाद थेट श्रोत्यांपर्यंत पोहोचवू शकतो. प्रत्यक्ष साहित्यिकाकडून साहित्यातील अनुभवविश्व कथन, संवादाच्या माध्यमातून ऐकल्यामुळे डिजिटल प्लॅटफॉर्म हा लेखक आणि वाचक यांच्यातील अंतर कमी करणारा दुवा ठरला आहे. संशोधक आणि वक्तेही आपल्या विचारांची मांडणी करण्यासाठी डिजिटल ऑडिओ माध्यमांची निवड करताना दिसून येतात. Spotify, audible(amazon), storytel, kuku fm, youtube, पॉडकास्ट,ऑडिओबुक्स या ॲपवर हे श्राव्य साहित्य साहित्यिक चर्चा, कथाकथन, नाट्यरूपांतर (audio drama) आणि कविता वाचन या स्वरुपात उपलब्ध होत असल्यामुळे साहित्य प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे डिजिटल माध्यमांनी श्राव्य साहित्याच्या विकासाला मोठी चालना दिली आहे असे म्हणता येते.

श्राव्य साहित्याच्या सहज उपलब्धतेमुळे डिजिटल युगात हा साहित्य प्रकार वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. इंटरनेटमुळे कोणालाही जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील साहित्याचा आस्वाद ध्वनिस्वरुपात घेणे सहज शक्य झाले आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर साहित्य प्रसार होण्यास श्राव्य साहित्याची मदत झाली आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

"राज्य मराठी विकास संस्थेने ज्ञानेश्वरी, दासबोध, कृष्णाकाठ तसेच विंदा करंदीकर, कुसुमाग्रज यांच्या कविता श्राव्य स्वरुपात उपलब्ध करून दिलेल्या आहेत."३ https://rmvs.marathi.gov.in

## V. पॉडकास्ट

Collins dictionary मध्ये पॉडकास्ट या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आढळून येते. सध्या पॉडकास्ट म्हणजे नेमके काय हे समजून घेण्यासाठी तिचा विचार कारणे क्रमप्राप्त ठरते.

"a podcast is an audio file similar to a radio broadcast, that can be listened to on a website or app on your phone, computer, etc."४

पॉडकास्ट हे इंटरनेटवर उपलब्ध असलेले ध्वनिफीत(ऑडिओ) किंवा चित्रफित (व्हिडीओ) कार्यक्रम आहेत. पॉडकास्ट या शब्दाची निर्मिती ॲपलचे 'ipod' डिव्हाईस आणि 'broadcast' (प्रसारण) या दोन शब्दापासून झाली आहे. पॉडकास्ट मोफत व सशुल्क अशा दोन्ही स्वरुपात असून यामध्ये सबस्क्रिप्शन सुविधा उपलब्ध असते. आपण एखादा पॉडकास्ट अनुकरण/सदस्यत्व (फॉलो/सबस्क्राइब) केल्यानंतर त्याचा नवीन भाग आला की लगेच आपल्याला संदेश (नोटिफिकेशन) प्राप्त होत असतो.

पॉडकास्टचे स्वरूप एखाद्या रेडीओवरील कार्यक्रमासारखे आहे परंतु यावरील कार्यक्रम त्यासारखे लाईव्ह ऐकण्याऐवजी आपण ते इंटरनेटवरून डाऊनलोड करून ऑफलाईन किंवा ऑनलाईन स्ट्रीम करून केंव्हाही ऐकू शकतो. या कार्यक्रमांमध्ये विविध विषयांवर आधारित चर्चा, कथा, मुलाखती आणि व्याख्याने किंवा त्यांची मालिका सादर केली जातात. पॉडकास्टमुळे साहित्यिक अभिव्यक्तीचे नवनवीन मार्ग खुले झाले आहेत. लेखक, संशोधक आणि साहित्यरसिकांना आपले विचार थेट श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळत आहे. नवोदित लेखकांनाही आपले विचार सादर करण्यासाठी नवे व्यासपीठ मिळाल्यामुळे साहित्य निर्मितीची प्रक्रिया अधिक लोकशाहीवादी बनली आहे असे म्हणता येते.

पॉडकास्टच्या सहज उपलब्धतेमुळे त्याची लोकप्रियता वाढली आहे. या माध्यमामुळे श्रोते आपल्या सोयीने प्रवासात, काम करताना किंवा कोणत्याही वेळी पॉडकास्ट ऐकू शकतात. या सर्व कारणांमुळे पॉडकास्ट हे आधुनिक काळातील श्राव्य साहित्याचे अत्यंत प्रभावी माध्यम ठरले आहे.

आपण spotify, apple podcasts, youtube किंवा google podcasts इत्यादी प्लॅटफॉर्मवर पॉडकास्ट ऐकू शकतो.

मराठीतील काही लोकप्रिय पॉडकास्ट व वेबसाईट्स –

१. मराठी आकाशवाणी –(कथा, कविता, नाटक तसेच विविध विषयांवरील माहिती) –
   radio 4eb 98.1fm, each thursday 9:00 pm
२. Kuku fm – (१००० + मराठी कथा व शो) – https://kukufm.com
३. Spotify – https://open.spotify.com
४. Feedspot for podcasters (८० सर्वोत्कृष्ट मराठी पॉडकास्ट) -https://podcast.feedspot.com
५. सुधीर महाजनी यांच्या मराठी कथा – https://podcast.feedspot.com

याशिवाय कथाकथन, कथामंजुषा, कविता, खुसपूस – (अस्वस्थ विषयांवर), संतांच्या पाऊलखुणा, शब्दफुले (मराठी कथा), स्टोरीटेल कट्टा, गोष्ट दुनियेची (जागतिक घडामोडी), छोट्यांच्या गोष्टी, priyankanimkar_official(marathi & hindi podcast) (कथा आणि ऑडिओबुक्स), मेतकूट (विविध विषयांवरील विविध मते आणि दिलखुलास चर्चा), मराठी खिडकीतून (मराठी संस्कृतीवर चर्चा) इ. कथा, कादंबरी, साहित्यविषयक चर्चांबरोबर सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, प्रवासवर्णन, प्रेरणादायी, स्त्रीविश्व, आयुर्वेद, अध्यात्म इ. विषयावरील अनेक मराठी पॉडकास्ट उपलब्ध आहेत.

## VI. ऑडिओबुक्स (ध्वनिमुद्रित पुस्तके)

पुस्तकांचे ध्वनिमुद्रित स्वरूप म्हणजे ऑडिओबुक्स होय. या माध्यमात पुस्तकातील मजकूर एखाद्या वक्त्याने वाचून ध्वनिमुद्रित करून श्रोत्यांना ऐकण्यासाठी उपलब्ध करून दिला जातो. कथनातील आवाज, त्याचा टोन आणि भावना यामुळे कथा अधिक जिवंत वाटते.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

ही पुस्तके मोबाईलवर डाउनलोड करून ऑफलाइन-इंटरनेटशिवाय मोफत व सशुल्क दोन्ही स्वरुपात सहजपणे उपलब्ध होतात. ऑडिओबुक्समुळे साहित्याचा अनुभव घेण्याच्या पद्धतीतही बदल झाले आहेत. आजच्या धावपळीच्या युगात लोकांना वाचनासाठी वेळ मिळत नाही.अशावेळेला ऑडिओबुक्स हा एक प्रभावी पर्याय ठरला आहे. मल्टिटास्किंगमुळे काम करताना, प्रवासात वाचनाशिवाय केवळ ऐकून ऑडिओबुक्सच्या माध्यमातून साहित्याचा आस्वाद घेता येतो. याशिवाय दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींसाठीही ऑडिओबुक्स अत्यंत उपयुक्त ठरतात. आज अनेक कथा, कादंबऱ्या, नाटक इ. ललित व ललितेतर साहित्य ऑडिओबुक स्वरूपात उपलब्ध आहे त्यामुळे साहित्यप्रसार अधिक मोठ्या प्रमाणावर होत चालला आहे.

सध्या instagram, kuku fm, pratilipi fm, storytel, youtube, facebook, इत्यादी प्लॅटफॉर्मवर नि:शुल्क ऑडिओबुक्स उपलब्ध आहेत.

Audible हा amazon चा ऑडिओबुक प्लॅटफॉर्म असून या प्लॅटफॉर्मवरील उच्च दर्जाचा आवाज, महत्त्वाच्या ठिकाणी बुकमार्क लावणे, नोंदी करणे, स्लीप टायमर तसेच प्लेबॅक सोयीमुळे आवाजाची गती कमीजास्त करणे, ऑडिओ पॉज करणे, बंद करणे अथवा मागेपुढे करता येतात. एपिसोड/पुस्तक थेट डाउनलोड करून audible ॲपमध्येच इंटरनेटशिवाय ऐकता येतात, सबस्क्रिप्शन मॉडेलची सोय असल्याने मासिक प्लॅन (credits system) किंवा प्रत्येक महिन्याला एक ऑडिओबुक घेण्याची सुविधा यामध्ये दिली गेली आहे. या सुविधांमुळे audible ने श्राव्य साहित्यात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

**मराठीतील काही प्रसिद्ध लेखकांच्या ऑडिओबुक्स –**

वि. स. खांडेकर – ययाती, शिवाजी सावंत - मृत्युंजय, छावा, विश्वास पाटील - संभाजी, पानिपत, जयवंत दळवी – कौसल्या, भालचंद्र नेमाडे – कोसला, ग. दि. माडगुळकर – थोरली पाती, आण्णा भाऊ साठे- तारा, रामोशी, दादा न्हावी, व. पु. काळे - वपुर्झा, रत्नाकर मतकरी – संभ्रमाच्या लाटा, अच्युत गोडबोले – मुसाफिर, संदीप खरे – क्षितिजापार , ताई मी कलेक्टर व्हयनु, इकीगाई, rich dad poor dad इ. मराठी कथा कादंबऱ्या, कविता, नाटक तसेच इंग्रजी व अनुवादित अशी शेकडो पुस्तके.

**ऑडिओबुक्ससाठी काही नि:शुल्क ॲप्स व वेबसाईट्स –**

१. Word press.com - https://karmveerlibrary.wordpress.com
२. बोलती पुस्तके – https://boltipustake.blogspot.com
३. राज्य मराठी विकास संस्था - https://rmvs.marathi.gov.in
४. इंटरनेट आर्काइव्ह – https://archive.org
५. Apple - (marathi audiobooks by netra - app store) – https://apps.apple.com
६. Facebook – https://www.facebook.com किंवा **संपूर्ण साहित्य (sampurnsahitya.com)**
७. स्मॅशवर्ड्स - (smashwords)
८. Audible amazon – https://www.audiobooks.com

**याशिवाय ऑडिओबुक्ससाठी सशुल्क व नि:शुल्क स्वरुपात ॲप्स व वेबसाईट्स -**

मराठी ग्रंथ संग्रहालय (marathilibrary.com), प्रोजेक्ट गुटेनबर्ग (gutenberg.org),
फ्लिपकार्ट ईबुक्स – (flipkart ebooks) (amazon kindle), गुगल प्ले बुक्स - google play book, इ.शंभरहून अधिक ॲप्सवर ऑडिओबुक्स उपलब्ध आहेत.

## VII. श्राव्य साहित्याचे योगदान

श्राव्य साहित्य हे समाजातील विचार, मूल्ये आणि संस्कृती यांचा प्रसार करण्याचे प्रभावी साधन आहे. विशेषतः वाचनाची सवय नसलेल्या, ग्रामीण आणि अल्पशिक्षित समाजघटकांपर्यंत साहित्य पोहोचविण्यासाठी अत्यंत उपयुक्त असे हे माध्यम आहे. अशा व्यक्तींना श्रवणाच्या माध्यमातून साहित्य समजून घेण्यास मदत होते.

लोकपरंपरा, लोकगीते, लोककथा आणि इतर मुद्रित साहित्य यांचे ध्वनिमुद्रण करून त्यांचे जतन करता येते. यामुळे लोकसाहित्य, लोकसंस्कृतीचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे सोपे जाते. त्यामुळे लोकसंस्कृतीच्या जतन, संवर्धन आणि प्रसारामध्ये श्राव्य साहित्य महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसून येते.

शिक्षण क्षेत्रातही अनेक शैक्षणिक व्याख्याने आणि अभ्यासक्रम ऑडिओ स्वरूपात उपलब्ध होत असल्यामुळे श्राव्य साहित्याचा वापर वाढत आहे.

एकूणच सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात श्राव्य साहित्याचे मोलाचे योगदान आहे.

## VIII श्राव्य साहित्यापुढील आव्हाने

आधुनिक काळात श्राव्य साहित्याला जरी लोकप्रियता लाभली असली तरी त्याच्या प्रसारापुढे काही आव्हानेही दिसून येतात ती पुढीलप्रमाणे -

१. रेकॉर्डींग व संपादन प्रक्रिया खर्चिक असल्याने दर्जेदार साहित्य निर्माण होईलच असे नाही.
२. प्रादेशिक आणि ऐतिहासिक साहित्यातील संदर्भ समजून घेऊन त्यातील भावनिक अभिव्यक्ती इ. गुणवत्तेच्या दृष्टीने आव्हान आहे.
३. श्राव्य साहित्यातून मिळणारे अनुभव हे पूर्णतः कथनकर्त्यावर अवलंबून असतात.
४. श्रोत्यांना खिळवून ठेवण्यासाठी रेकॉर्डींगची गुणवत्ता, पार्श्वसंगीत व स्पष्ट आवाज या तांत्रिक बाबींचा दर्जा टिकवून ठेवणे हे एक मोठे आव्हान आहे.
५. आशयानुरूप अशा स्पष्ट आणि भावपूर्ण आवाज असणाऱ्या वाचकांची/कलाकारांची कमी असल्यामुळे दर्जेदार आवाजाची निवड करून त्यावर योग्य ते संपादन (एडिटिंग) करणे व साहित्याचा मूळ आत्मा जपत त्याचे ध्वनित रुपांतर करणे ही प्रक्रिया फार जटिल बनली आहे.

## IX. निष्कर्ष

१. श्राव्य साहित्याची मुळे प्राचीन मौखिक परंपरेमध्ये आढळतात आणि भारतीय संस्कृतीत वेदपठण, कीर्तन, प्रवचन, पोवाडे आणि लोककथा यांच्या माध्यमातून साहित्याचा प्रसार प्रामुख्याने श्रवणाच्या माध्यमातूनच होत आला आहे.
२. पॉडकास्ट आणि ऑडिओबुक्स यांसारख्या आधुनिक माध्यमांमुळे लेखक, संशोधक तसेच नवोदित लेखकांना विचारांच्या अभिव्यक्तीसाठी नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.
३. पॉडकास्ट, ऑडिओबुक्स आणि डिजिटल कथाकथनाच्या माध्यमातून पारंपरिक मौखिक परंपरेला श्राव्य साहित्याच्या माध्यमातून नवीन स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे श्राव्य साहित्य हे केवळ परंपरेचे जतन करणारे साधन नसून आधुनिक युगात त्या परंपरेला नवसंजीवनी देणारे माध्यम ठरले आहे.
४. श्राव्य साहित्यामुळे साहित्यप्रसार सर्वसमावेशक झाला आहे, दृष्टीदोष असलेले लोक, वृद्ध व्यक्ती तसेच वाचनाची अडचण असलेल्या व्यक्तींनाही साहित्याचा अनुभव सारख्याच पद्धतीने घेता आल्यामुळे हे साहित्य लोकशाहीवादी बनत आहे.
५. एकूणच श्राव्य साहित्य हे परंपरेचा वारसा जपत आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेणारे प्रभावी माध्यम आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, व नवनवीन डिजिटल साधने यांच्या सहाय्याने श्राव्य साहित्य अधिक समृद्ध व व्यापक होईल. त्यामुळे मौखिक परंपरेचा हा आधुनिक आविष्कार समाजाच्या सांस्कृतिक व बौद्धिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावत राहील.

## संदर्भ

१. तुपे, केशव. 'मुद्रित आणि श्राव्य माध्यमे :लेखन व संवाद',अथर्व पब्लिकेशन्स,पुणे, आवृत्ती पहिली.
२. Google.com/search?q=श्राव्य साहित्य
३. Https://rmvs.marathi.gov.in
४. Https://www.collinsdictionary.com/